Publication: Prahaar
Date: 20/6/2019
Page: 2
Column: 1

प्रहार
गुरुवार, २० जून २०१९

# पावसाळ्यातील खबरदारीसाठी अदानी इलेक्ट्रिसिटी सज्ज

**मुंबई :** पावसाळ्यात ऐनवेळी उद्‌भवणाऱ्या विजेच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी तसेच सुरक्षितता आणि वीजपुरवठा खंडित होण्याच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) ने हेल्पलाईन नंबर प्रसिध्द केले आहेत. पावसाळ्यातील संभाव्य नैसर्गिक आपत्तीदरम्यान वीजपुरवठा वितरणाचे नुकसान कमी करण्यासाठी एकीकृत आपत्ती व्यवस्थापन योजनेचा अवलंब केला आहे. त्यासाठी पुढील पर्यायांचा वापर ग्राहकांनी करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. आग लागणे आणि विजेचा धक्का लागणे अशा आपत्तीजनक स्थितींमध्ये ग्राहकांनी जून ते सप्टेंबरदरम्यान ३००९९१११/३००९७२२५ या क्रमांकावर थेट संपर्क साधावा. ग्राहकांनी त्यांच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावरून १८००५३२९९९८ या क्रमांकावर मिस कॉल द्यावा.

adani
Electricity